Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2505I6VXIIIP0008
e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
JUNE-2025
Issue–VI, Volume–XIII

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीयांच्या सक्षमिकरणात योगदान

**संशोधक - प्रा. सुचिता इंगळे**
पाली आणि बुद्धिझम विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर

**सारांश :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून आपण सर्वजण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गौरवतोच, पण त्यांच्या जीवनातील सर्वात गौरवशाली पर्व आहे ते हिंदू कोड बिल संघर्षाचे. भारतीय हिंदू स्त्रियांना हजारो वर्षांच्या भीषण अंधःकारातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिल तयार केले. या बिलामुळे प्रत्येक स्त्रीला विवाह, वारसा, याबरोबरच दत्तकविधान, उत्तराधिकार, पोटगी, घटस्फोट यासंबंधीचे महत्त्वपूर्ण अधिकार मिळणार होते. 'आंबेडकर स्मृती' म्हणून ओळखले जाणारे हे बिल डॉ. आंबेडकरांना राज्यघटनेपेक्षाही महत्त्वाचे वाटत होते. कारण अतिशूद्र ठरविल्या गेलेल्या सर्व वर्षांच्या स्त्रियांचे ते मुक्तिगीत होते. बुद्ध धर्माने सर्वप्रथम स्त्रीच्या समानतेच्या अधिकारांचा पुरस्कार केला, पण नंतर येणाऱ्या हिंदुधर्मान धार्मिक ग्रंथांच्या साहाय्याने स्त्रीला संपूर्ण अधिकारांपासून वंचित केले आणि स्त्रीच्या अधोगतीची येथून परत सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू स्त्रीच्या दयनीय स्थितीस कारणीभूत ठरलेल्या हिंदू धर्माच्या रूढी, रीती आणि परंपरांचा सखोल अभ्यास केला आणि अशा धार्मिक परंपरांचा विरोध व स्त्री अधिकारांचा पुरस्कार म्हणजे 'हिंदू कोड बिल'. भारतीय स्त्रियांचे होत असलेले आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक शोषण पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर अत्यंत व्यथित होत असत. भारतीय स्त्रियांचा उद्धार झाल्याशिवाय देशामध्ये क्रांती होऊ शकत नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणून त्यांनी स्त्रीयांच्या उन्नत्तीवर भर दिला. व भारतीय संविधानामद्धे स्त्रियाना हक्क आणि अधिकार मिळवुन दिले;त्यामुळे आज आपल्याला प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचे योगदान दिसून येते.

स्त्री स्वातंत्र्याचे पहिले उद्‌गाते भ. बुद्ध व मानव प्राण्यांमध्ये पुरुषापेक्षा जास्त श्रेष्ठ स्त्री आहे असा निर्वाळा देणाऱ्या महात्मा जोतिबा फुल्यांचा स्त्री स्वातंत्र्याबाबतचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे चालविला. त्यातूनच आजच्या सक्षम स्त्रीची निर्मिती झाली. विद्याविभूषित होऊन जीवनाच्या विविध क्षेत्रात ही स्त्री पुरुषाच्या बरोबर कार्यरत होऊन राष्ट्रविकासाच्या कार्यात तिची निर्णयक्षमता उपयुक्त ठरत आहे

परंतु "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति " म्हणजे स्त्रीला कोणत्याच प्रकारचे स्वातंत्र्य नाही असा धार्मिक कायदा करून स्त्री स्वातंत्र्याचा द्वेष्टा असा मनु आणि ज्या धर्मासाठी त्याने हा कायदा करून दिला तो हिंदू धर्मच स्त्रियांच्या अवनतीस जबाबदार आहे, हे बाबासाहेबांनी "हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती" या आपल्या निबंधवजा लेखात अनेक पुराव्यानिशी सिद्ध केले आणि बौद्धधम्म स्त्रियांच्या अवनतीस मुळीच जबाबदार नाही हे ठामपणे स्पष्ट केले, या निबंधवजा पुस्तिकेत बाबासाहेब म्हणतात " प्राचीन काळी स्त्रियांचा सामाजिक दर्जा उन्नतावस्थेत होता. तो फार उच्च की, " प्रतीचा होता. स्त्रियांना उपनयन विधीचा हक्क होता. म्हणजेच सांस्कृतिक दृष्टीने तिला पुरुषांइतकेच स्वातंत्र्य होते. तसेच त्या वेदातील मंत्र म्हणू शकत होत्या, वेदाध्ययन करू शकत होत्या. थोडक्यात असे म्हणता येईल की, विद्याभ्यासाच्या जोरावर स्त्री समाजात उच्चतमपदी जाऊ शकत होती. त्यानंतरचा काळ मात्र ब्राह्मणी धर्माच्या वर्चस्वामुळे स्त्रियांसाठी भयावह ठरला होता. परंतु बुद्धकाळात तर स्त्री उन्नतावस्थेत पोहचली होती. कारण भगवान बुद्धाने स्त्रियांचे स्वातंत्र्य मान्य केले होते. बुद्धाने भिक्षुणी संघाच्या रुपाने स्त्रियांना त्यांच्या आत्मोन्नतीचा मार्ग मोकळा उपासिकांसाठी सुद्धा मन संस्कारित करणाऱ्या शिक्षण संस्थांची निर्मिती

करून त्यांना त्यांच्या ज्ञानाचा मूलभूत अधिकार मिळवून दिला. जीवनातील उच्च प्रतीच्या आनंदाने जीवन साफल्याचा आनंद मिळवून दिला. तेव्हा बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे ' शिक्षण करून विहाराच्या रुपाने सर्व थरातील स्त्रियांसाठी, केवळ भिक्षुणीसाठीच नव्हे तर लिंगभेदाबद्दल अढी न बाळगता बुद्धाने स्त्रियांना थोरपदाला पोहोचविण्याचा मार्ग मोकळा करून दिला, अर्थात स्वातंत्र्याबरोबर पुरुपाइतकाच समतेचा दर्जा स्त्रियांना मिळाला.

अशा प्रकारे प्राचीन काळात स्त्रीपुरुष समतेचा पुरस्कार करून स्त्री स्वातंत्र्याचे उद्गाते म्हणून सन्मानास पात्र झालेले भगवान बुद्ध आणि १९ व्या शतकात स्त्रियांचे उद्धारक, स्त्रीशिक्षणाला अग्रक्रम देणारे द्रष्टे पुरुष महात्मा जोतिबा फुले यांना गुरुस्थानी मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आजच्या आधुनिक युगात दलितांप्रमाणेच, परंतु केवळ दलित वर्गातील नव्हे तर समस्त वर्गातील स्त्रियांचा कैवार घेतला आणि मनुप्रणीत प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या बळी पडलेल्या स्त्रियांच्या मुक्तिसाठी उद्धारासाठी विविध माध्यमातून अथक प्रयत्न केले. प्रसिद्ध विचारवंत भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरोखर भारतीय समाजकारणाचा द्वंद्वसमास होत. कारण ते दोघेही गुरुशिष्य भारताच्या सामाजिक इतिहासात विशेषतः त्यांच्या स्त्रीविषयक कार्यातही सारखेच महत्त्वाचे ठरतात. आधुनिक युगातील या गुरुशिष्यांना अभिप्रेत असणाऱ्या स्त्री स्वातंत्र्याचे आणि आजच्या सक्षम स्त्रीचे नाते हे अतूट नाते आहे. समाज शास्त्रज्ञ असणाऱ्या बाबासाहेबांनी एकूणच भारतीय स्त्रियांच्या दयनीय अशा स्थितीचा सूक्ष्मपणे अभ्यास केला आणि त्यांनी विचार केला की, ज्यावेळी जगातील कोणत्याही देशात स्त्रियांना इतका मानसन्मान मिळत नव्हता, त्यावेळी भारतातील स्त्रियांना तो मिळत होता; परंतु त्यांची नंतर जी अवनती झाली ती कोणामुळे? आणि त्यांना त्याचे उत्तर मिळाले की, स्त्रियांची वैदिक काळानंतर आणि बुद्धकाळानंतर जी अवनती झाली ती हिंदुंना धार्मिक कायदे करून देणाऱ्या मनुमुळे. अर्थात याविषयी कोणाला काही शंका राहू नये म्हणून त्यांनी मनुच्या मनुस्मृती ग्रंथात त्या मनुने स्त्रियांच्या एकंदर जीवनासंबंधी जे धार्मिक कायदे लिहून ठेवले होते तेच त्यांनी लोकांच्या दृष्टीस आणून दिले आणि अखिल स्त्री जातीच्या जिव्हाळ्यातून आत्मीयतेतून स्त्रीद्वेष्ट्या मनूने केलेले स्त्रियांवरील अन्यायकारक जाचक कायदे नष्ट कसे होतील याचा ध्यास घेतला आणि भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्रियांना स्वातंत्र्य, समता व संरक्षण मिळवून देण्याचे प्रयत्न केले आणि राज्यघटनेच्या माध्यमातून तसेच हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून हिंदू धर्माने तिच्यावर लादलेले दास्य नष्ट करण्यासाठी, त्यांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांच्या ध्येयवादी मनाने अथक प्रयत्न केले आणि त्याचीच परिणती त्यांनी मनुस्मृतीचे दहन करण्यातकेली. थोडक्यात असे म्हणता येईल की, स्त्रीद्वेष्ट्या मनूने स्त्रीच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण करण्यासाठी जे स्वातंत्र्य नाकारले तेच स्त्री स्वातंत्र्य बाबासाहेबांना अभिप्रेत होते. जे स्वातंत्र्य धर्म, रुढी परंपरेने नाकारले होते, ते स्वातंत्र्य स्त्रियांना त्यांनी संविधानातून मिळवून देऊन भारतीय स्त्रीमुक्तिच्या इतिहासात भरीव क्रांती केली.

डॉ. बाबासाहेबांच्या मते, बौद्धकाळात स्त्रीला जे संपूर्ण स्वातंत्र्य होते ते हिरावून घेणे एवढेच मनूला कायद्याने साध्य करावयाचे होते. स्त्री स्वातंत्र्य मनूच्या डोळ्यात सलत होते. म्हणूनच ते नष्ट करून त्याने स्त्रीला दास्यकर्दमात रोवून ठेवले. यावरून स्त्रीला दास्यकर्दमातून मुक्त करण्यासाठी स्त्रीला स्वातंत्र्याची निश्चितच गरज आहे हे बाबासाहेबांना अभिप्रेत होते. अर्थात या स्वातंत्र्यासाठी पोषक वातावरण बौद्ध धम्मात निश्चितच आहे. तिचा संपूर्ण शारीरिक व मानसिक विकास व्हावा म्हणूनही बाबासाहेबांनी दलित समाजातील स्त्रियांच्या सुधारणेसाठी बौद्ध धम्माची दीक्षा देऊन स्त्रियांच्या उन्नतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

स्त्रीदेष्ट्या मनूच्या मते तर "स्त्रीच्या लहानपणात बाप तिचे पालनपोषण करतो, नवरा तिच्या तरुणपणात तिचे रक्षण करतो आणि वृद्धावस्थेत मुले तिचे रक्षण करतात म्हणून स्त्री स्वातंत्र्याला लायक नाही". म्हणूनच

त्याने कुटुंबातील मुलींना, तरुणींना, वृद्ध स्त्रियांना कुटुंबातील व्यवहाराच्या बाबतीत स्वतंत्रपणे काहीही करण्याचा अधिकार दिला नाही. तिला घटस्फोटाचा अधिकार नाही. पतीपासून वेगळे राहण्याचे स्वातंत्र्य नाही. कुटुंबाच्या स्थावर जंगम मालमत्तेचा म्हणजेच संपत्तीचा अधिकार नाही. पोटगीचा अधिकार नाही. (पतीला तिला मारहाण करण्याचा हक्क त्याने मान्य केला.) ज्ञानार्जनाचा हक्क हिरावून घेतला. यज्ञविधीचा, विधवा विवाहाचे, पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य नाकारले. हे आणि अशा प्रकारे स्त्रियांचे जीवन बंदिस्त करण्याचे, त्यांच्या जीवनाचा कोंडमारा करून ते उद्ध्वस्त करण्याचे अत्याचारी कायदे करून स्त्रीला गुलाम करण्याचे कायदे त्याने केले.

स्त्री जीवनाची ही विटंबना बाबासाहेबांना अस्वस्थ करीत होती. म्हणून त्यांना स्त्रिला माणूस म्हणून जगण्यासाठी स्वातंत्र्याचा अधिकार असणे आवश्यक वाटले, न्यायपूर्ण वाटले. त्यासाठी त्यांनी स्त्रियांना हिंदू विवाह कायदा, वारसा कायदा, पालकत्वाचा कायदा, दत्तक व पोटगीचा कायदा करून मनुप्रणीत धर्म व रुढीतून मुक्त केले. राज्यघटनेच्या १५ व्या कलमानुसार स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार केलाआणि पुरुषाप्रमाणेच स्त्रीला स्वातंत्र्य मिळवून दिले.

इतर सुधारकात व बुद्ध-फुलेंच्या स्त्रीविषयक भूमिकेत फरक होता. बुद्ध-फुलेंच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू माणूस हाच होता. अर्थात माणूस म्हणजे फक्त पुरुषच नव्हे तर स्त्री सुद्धा माणूसच आहे. म्हणून स्त्री-पुरुषाच्या समानतेचा त्यांनी पुरस्कार केला. अर्थात स्त्री ही सुद्धा माणूसच आहे हे सांगण्याची आजही गरज भासते. तेव्हा स्त्रीविषयक त्यांची भूमिका ही भूतदयावादी भूमिका नव्हती ती मानवतावादी भूमिका होती. स्त्री जन्म दुःखदायक आहे. स्त्रीला अबला समजून पुरुषी वर्चस्ववृत्तीने सर्व सत्ता आपल्याच हातात ठेवणाऱ्या या लोभी आणि धाडशी पुरुषांनी धूर्तपणे कोणत्याही कामात स्त्री जातीची संमती घेतल्याशिवाय आपली मक्तेदारी ठेवून स्त्रीला केवळ उपभोग्य वस्तू मानले. हे बुद्ध-फुल्यांप्रमाणेच बाबासाहेब आंबेडकरांनी लक्षात घेतले आणि तिच्या स्वतंत्र व्यक्तीमत्वाचा विकास व्हावा यासाठी आवश्यक असे स्वातंत्र्य तिला मिळवून दिले.

स्त्री, मानवी समाजाचा निम्मा, पुरुषाप्रमाणेच महत्त्वाचा घटक आहे. तिचा विकास झाल्याशिवाय कोणत्याही कुटुंबाचा, समाजाचा आणि राष्ट्राचा विकास होणार नाही. म्हणून तिच्या व्यक्तीमत्त्वाचा चौफेर विकास व्हावा, ती स्वावलंबी व्हावी, फक्त चूल आणि मूल एवढेच तिचे क्षेत्र मर्यादित असू नये, तिने घराचा उंबरठा ओलांडून जीवनाच्या विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवावे एवढ्या व्यापक स्वरुपाच्या तिच्या सक्षमतेचा विचार बाबासाहेब करीत होते. म्हणूनच ज्यांनी संकुचित स्वातंत्र्याचा विचार केला त्यांच्याप्रती त्यांनी आपला विरोध प्रगट केला आणि स्त्रीच्या व्यापक स्वातंत्र्याचा ज्यांनी विचार केला त्याविषयी ते म्हणतात, " स्त्रियांनी गृहलक्ष्मी तेवढे व्हावे, त्यांच्यापुढे स्त्रियांच्या प्रगतीची मजल जाऊ नये ही मर्यादा अबला उन्नतीसाठी झटणाऱ्या बऱ्याच सुधारकांनी आपल्यापुढे ठेवल्याचे दृष्टीस पडते. आमच्या मते अशा प्रकारे संकुचित ध्येय स्त्रीवर्गापुढे ठेवणे अनुदारपणाचे होय." याचा अर्थच स्त्रीला केवळ घरातच नव्हे तर घराबाहेर जाऊन आपला विकास करण्याचे व्यापक स्वरुपाचे स्वातंत्र्य बाबासाहेबांना अपेक्षित होते. आज राष्ट्रविकासात स्त्रीची निर्णयप्रक्रिया महत्त्वाची ठरल्याची अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. आज संविधानामुळे स्त्रीचे सक्षमीकरण झाले आहे. अबला समजल्या जाणाऱ्या स्त्रीला सबला मानण्याची विचारधारा जनमानसात रुजविण्याची, स्त्री सक्षमीकरणाची अशी क्रांती बाबासाहेबांना अभिप्रेत होती. स्त्री ही पुरुपाच्या तुलनेत अधिक सहनशील असून, कोणत्याहीकामाचा ताण ती कमी घेते हे निरीक्षणावरून सिद्ध झाले आहे. म्हणून स्त्रीला घरातच नव्हे तर घराबाहेर कर्तृत्व गाजविण्याची संधी समाजाने दिली पाहिजे. म्हणजे स्त्री समाजाला, राष्ट्राला उपकारक ठरू शकते. विकासकार्याला तिच्या सहकार्याने अधिक पूर्णता येऊ शकते. प्राचीन काळाचा जर विचार केला तर याची खात्री आपणास पटू शकते. स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कर्ता भ. बुद्धाने असे स्त्री स्वातंत्र्य मान्य केले आणि त्यातून "आमचे स्त्रीत्व आमच्या विकासाच्या आड येत

नाही. हा आत्मविश्वास सोमा, भिक्षुणीच्या रुपाने स्त्रीवर्गात निर्माण झाला. या स्वातंत्र्यामुळेच विशाखेसारखी दानशूर उपासिका स्त्री बौद्ध धम्मात जन्मास आली, जिने आपले स्त्रीधन विकून विहार दान केले. भगवान बुद्धासारख्या मानवतावादी धम्मसंस्थापकाकडून विनंती करून भिक्षुभिक्षुणी संघासाठी चांगले कार्य केले. स्त्रियांमध्ये अशा प्रकारची क्रांती त्यांना अपेक्षित होती. तोच वारसा बाबासाहेबांनी संविधानाच्या व त्यातल्या हिंदू कोड बिलाच्या रुपाने पुढे बाबासाहेबांना कुटुंबनियोजनाच्या माध्यमातूनही स्त्री स्वातंत्र्य अभिप्रेत होते. कारण स्त्री कमी बाळंत झाली तर तिच्यातली स्त्री इतर कामांकडे वळवता येईल, असा आधुनिक विचार या संदर्भात बाबासाहेबांनी मांडला आणि स्त्री-पुरुषांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटून दिले.

त्यांच्या स्त्री स्वातंत्र्याचा हा विचार फक्त विशिष्ट वर्गातल्या, विशिष्ट थरांतल्या स्त्रियांपुरताच मर्यादित नव्हता तर तो सर्व थरातील स्त्रियांसाठी होता. म्हणूनच मजूरमंत्री असताना कामगार स्त्रियांनाही पुरुषांइतकेच वेतन असावे, त्यांचे कामाचे तास ठराविक असावे, कामाचे ठिकाण सुरक्षित असावे, बाळंतपणाची रजा मिळावी, कामगार स्त्रियांच्या लहान मुलांसाठी पाळणाघराची सोय असावी, त्यांना मताधिकाराचे स्वातंत्र्य असावे अशा प्रकारे स्त्रियांसाठी अर्थार्जनाचे स्वातंत्र्य असणे आणि ते अर्थार्जन करताना त्यांना सुरक्षितता वाटावी, त्यांचे आरोग्य चांगले राहून त्यांनी तणावमुक्त वातावरणात काम करावे म्हणून त्यांना आर्थिक आणि आर्थिक क्षेत्रातले स्वातंत्र्य मिळवून देण्याचा बाबासाहेबांनी प्रयत्न केला. अर्थात स्त्री स्वातंत्र्या बाबतचा हा विचार मानवी समतेतून अभिप्रेत होता.

मनूने स्त्रीचे आर्थिक स्वातंत्र्य नाकारले होते; पण बाबासाहेबांनी ते मिळवून दिले. कारण आर्थिक स्वातंत्र्य मिळाले तर पुरुषांची ताबेदारी नक्कीच कमी होते. तसेच तिची कौटुंबिक व सामाजिक प्रतिष्ठा वाढते. अर्थात असे असेल तर तिची नोकरीदुय्यम समजली जाणे, अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीला पैसा खर्च करण्याचे स्वातंत्र्य नसणे हेही आजचे चित्र आहे. पण या आर्थिक स्वातंत्र्यामुळे स्त्री स्वाभिमानी, स्वावलंबी आणि आत्मोद्धारासाठी तयार होते.

अशा प्रकारे राज्यघटनेच्या १५ व्या कलमानुसार बाबासाहेबांनी स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार केला आणि या समतेमुळेच स्त्रियांना मनूने नाकारलेले स्वातंत्र्य पुरुषाप्रमाणेच मिळाले. एक व्यक्ती एक मत म्हणून स्त्रीला मताधिकार दिला, पण मनू गेला तरी मनुप्रवृत्ती अजूनही समाजात जिवंत आहे आणि स्त्रियांचीही मानसिकता "ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असू द्यावे समाधान।।" अशी वृत्ती धर्मरुढींनी निर्माण झाल्यामुळे राज्यघटनेने स्वातंत्र्याचा अधिकार मिळाला तरी स्त्री आपले स्वतःचे मन, बुद्धी स्वतंत्रपणे चालवू शकत नाही. परंपरागत रुढी व धर्माच्या ओझ्याखाली भारतीय स्त्री दबलेली आहे.

अर्थात एकीकडे असे दिसत असले तरी परंपरागत रुढी व कायद्यानी दडपून ठेवलेली स्त्री संविधानाच्या कायद्यानी बळकट होऊन सक्षम झाली व स्वयंनिर्णयाच्या क्षमतेने सज्ज होऊन सशक्तीकरणाच्या दिशेने वाटचाल करताना दिसते. प्रसिद्ध स्त्री लेखिका कुमुद पावडेंच्या मताशी मीपण सहमत आहे.

एकूणच काय तर कुटुंबात पुरुषप्रधान व पितृसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियाचे जीवन बंदिस्त असून, त्यांच्या जीवनाचा कोंडमारा होताना दिसतो. बाबासाहेबांच्या संवेदनशील मनाला स्त्रियांचे हे दुःख पाहून करुणा वाटली आणि तिला दुःखमुक्त व शोषणमुक्त करण्यासाठी तिला सक्षम करण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिलाची निर्मिती केली. हे हिंदू कोड बिल फक्त दलित स्त्रियांसाठीच नव्हते, हिंदू स्त्रियांसाठी सुद्धा आहे. पण दलितांचा हा नेता हिंदू स्त्रियांच्या हक्कासाठी निर्धाराने उभा राहिला याचा (संदर्भसुनिती पुंगलिया) आमच्या सवर्ण भगिनींना विसर पडू नये. या हिंदू कोड बिलातील कायद्यामुळे धर्म, रुढी परंपरेचे, अंधश्रद्धेचे जोखड झुगारून देण्याचे स्वातंत्र्य,

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2505I6VXIIIP0008
e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
JUNE-2025
Issue–VI, Volume–XIII

स्वहिताचे स्वकल्याणाचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, भारतीय स्त्रियांना, समस्त वर्गातील स्त्रियांना मिळाले, पण अजूनही बहुतांश स्त्रियांची बुरसटलेल्या रुढीतून मुक्त होण्याची मानसिकता नाही.

अर्थात अशा प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक आणि आर्थिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास मनाचे स्वातंत्र्य स्त्रियात बाबासाहेबांना अभिप्रेत होते. म्हणून बाबासाहेब म्हणतात की, ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जिवंत असून मेला आहे. मनाचे स्वातंत्र्यही जिवंतपणाची साक्ष आहे. मानसिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. स्त्री स्वातंत्र्याच्या बाबतीत बाबासाहेबांना हेच मनाचे स्वातंत्र्य अभिप्रेत होते. ते स्वातंत्र्य इथल्या चातुर्वर्ण्य विषम समाजव्यवस्थेतील समाजाने शूद्रांना आणि स्त्रियांना नाकारले होते. त्यामुळेच गुलामीचे जिणे त्यांच्या वाट्याला आले होते. ते स्वातंत्र्य समस्त वर्गातील स्त्रियांना मिळावे यासाठी बाबांची धडपड होती. हे स्वातंत्र्य हिंदू कोड बिलातून त्यातूनच आजच्या सक्षम स्त्रीची निर्मिती झाली.

मिळवून देऊन बाबांनी स्त्री स्वातंत्र्याचा ऐतिहासिक जाहीरनामा जाहीर केला आणि आज असे कोणतेच क्षेत्र नाही की, ज्यात स्त्री नाही. स्त्रीला शिक्षणाचे स्वातंत्र्य मिळाले, स्त्री-पुरुष समानतेचे स्वातंत्र्य मिळाले आणि स्त्रिया उच्चविद्याविभूषित झाल्या. उच्चविद्याविभूषित होऊन त्यांच्या स्वउद्धाराबरोबर कुटुंबोद्धार व राष्ट्रोद्धाराची सक्षमता आली आणि कधी वैयक्तीक, कधी संघटित होऊन आपल्या स्वातंत्र्यासाठी लढण्याची क्षमता तिच्यात आली. जे तिच्या स्वातंत्र्याच्या आड येतात त्याविरुद्ध दाद मागण्याची, प्रतिकार करण्याची क्षमता तिच्यात आली. आज देशाच्या राजकारणात, प्रशासन व्यवस्थेत तिच्या विकासकार्यात तिची जी सक्षमता दिसते याला कारण तिला मिळालेले स्वातंत्र्य आहे, जे स्वातंत्र्य बाबांना अभिप्रेत होते.

या ठिकाणी एका मुद्याचा परामर्श घेणे अतिशय गरजेचे आहे. तो मुद्दा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची दलित स्त्रीमुक्ती चळवळ. ज्या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी दलित पुरुषाप्रमाणेच दलित समाजाच्या प्रगतीसाठी उभा केलेला स्त्रीमुक्ती लढा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलित समाजाला या देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी म्हणून दलितोद्धारक लढा उभा करावा लागला. तेव्हा दलित स्त्रीची सुधारणा होणे तेवढेच महत्त्वाचे होते. कारण कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून समजण्यात येते. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी आपल्या दलितोद्धारक लढ्यात दलित स्त्रीमुक्ती लढा अंतर्भूत केला आणि विविध माध्यमातून तो लढा, ती चळवळ पुढे नेली.

तसे पाहिले तर समस्त वर्गातील स्त्रिया दलितच आहे, असे समजले जाते; पण दलित स्त्रियांचे दुःख सवर्ण स्त्रीपेक्षा अधिक वेगळे असते म्हणून तिच्या काही समस्यासुद्धा वेगळ्याच असतात. दलित स्त्री एक स्त्री म्हणून असहाय्य अगतिक आहे. दलित जातीच्या पुरुषाची स्त्री म्हणून अजून अतिदरिद्री व अज्ञानी म्हणून तिचेदुःख सवर्ण स्त्रीपेक्षा वेगळे व अधिक असते. बाबासाहेबांनी स्वतः अस्पृश्यतेचे आघात सहन केले. त्याच अनुभूतीतून त्यांचे संवेदनशील मन त्या स्त्रियांच्या उद्धारासाठी सतत तळमळत होते, गुदमरत होते. अनेक भाषणांतून, परिषदातून त्यांनी दलित स्त्रियांचे आत्मतेज जागृत केले. त्यांच्या कलंकित जीवनातून त्यांना बाहेर काढण्यासाठी त्यांची मानसिकता तयार केली. 'खाण तशी माती' हा निसर्ग नियम त्यांना सांगून त्या ज्या मुलांना जन्म देतात त्यांना शिक्षण देण्याचे त्यांच्यावर संस्कार करण्यासाठी प्रथम त्यांनाच शिकविण्याची निकड प्रतिपादित केली. अशा प्रकारे महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रही महिलांना उद्देशून त्यांनी केलेले भाषण तर त्यांच्या दलित स्त्रीमुक्ती लढ्याचा प्रेरणास्त्रोत ठरतो.

अशा प्रकारे बाबासाहेबांनी सुरू केलेल्या लढ्यात दलित आणि १९५६ नंतरची बौद्ध स्त्री उतरली आणि शिकून, संघटित होऊन संघर्षास सिद्ध झाली. बौद्ध धम्माच्या मानवतावादी मार्गाने तिने आपली वाटचाल सुरू केली आणि सक्षमपणे ती राष्ट्रविकास कार्यात महत्त्वाच्या भूमिका पार पाडीत आहे.

**ग्रामीण स्त्री कार्य ?**

https://doi.org/10.69758/GIMRJ/2505I6VXIIIP0008

हे जरी खरे असले तरी बाबासाहेब हे फक्त दलित स्त्रियांचेच उद्धारकर्ते नव्हते याची जाणीव आमच्या सवर्ण भगिनींना निश्चितच असणे आवश्यक आहे. कारण आज ज्या स्त्रीमुक्ति चळवळी सुरू आहेत त्या बाबासाहेबांच्या कार्याचा आढावा घेतल्याशिवाय पूर्ण होऊच शकत नाही; पण आमच्या बहुतेक सवर्ण भगिनी बाबासाहेबांचा उल्लेख करण्याचे हेतूपुरस्सर टाळतात. भारतीय राज्यघटनेतील १५ व्या कलमानुसार असलेली स्त्री-पुरुष समता आणि ज्या हिंदू कोड बिलासाठी त्यांना राजीनामा द्यावा लागला ते हिंदू कोड बिल दलित स्त्रियांसाठीच होते का? याचा आमच्या सवर्ण भगिनींनी अंतर्मुख होऊन विचार करणे गरजेचे आहे.

**निषकर्ष :** डॉ. आंबेडकर यांचे कार्य स्त्रियांच्या सबलीकरणासाठी एक प्रेरणास्थान आहे. त्यांच्या कार्यामुळे स्त्रिया समाजात अधिक सक्षम आणि सक्रिय झाल्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि समानतेसाठी मोठे कार्य केले. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला, सामाजिक आणि आर्थिक हक्कांना पाठिंबा दिला. त्यांच्या कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनात मोठे बदल झाले

## संदर्भ ग्रंथ

1. प्राचीन-अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल.- डॉ. अनिल सूर्या., सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, पुणे. प्रथमावृत्ती : १५ ऑक्टोबर २०१०
2. स्त्री-स्वातंत्र्य आणि बुद्ध-फुले-आंबेडकर - लेखिका : डॉ. दीपा रवींद्र श्रावस्ती.,जीवक हॉस्पिटल, डॉ. आंबेडकर रोड, सांगली. प्रकाशक : त्र्यंबकेश्वर मिरजकर., नाग-नालंदा प्रकाशन - विशालनगर, मु. पो. इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली. प्रथमावृत्ती : २५ डिसेंबर, २०११ (स्त्रीमुक्ती दिन)
3. अम्बेडकरवादी स्त्री-चिंतन सामाजिक शोषण के खिलाफ आत्मवृत्तात्मक संघर्ष - संपादक - तेज सिंह,. स्वराज प्रकाशन नई दिल्ली. 2011
4. बुद्ध तत्वज्ञान आणि प्रबोधन क्रांती - लेखक निरंजन पाटील., मुरबाड रोड, कल्याण (प.) जि. ठाणे, प्रज्ञाबोधी साहित्य प्रकाशन - कल्याण. प्रथमावृत्ती : 2006
5. बौद्ध धर्म और सामाजिक न्याय - रचनाकार : बाल्मीकि प्रसाद., प्रकाशक : सम्यक प्रकाशन- पश्चिम पुरी, नई दिल्ली – 2011